महाराष्ट्र शासन

Office of the Executive Director, Pench Tiger Conservation Foundation, Nagpur

**कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे कार्यालय**

३ रा माळा, संचार लक्ष्मी बिल्डींग (BSNL Building), कस्तुरचंद पार्क, नागपूर - ४४० ००१

दुरध्वनी क्र. ०७१२ - २५६०७२७/२५६०७४८ | Email ID :. edpenchfoundation@mahaforest.gov.in

Website:- www.mahapenchtiger.com | Safari Booking / सफारी बुकींग: www.mahaecotourism.gov.in

**क्रमांक**:-पेटाकंफा/प्र.क्र. / 86 /22-23 दिनांक. 04/05/2022

**प्रति,**

प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने),
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर.

**विषय**:- पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर महाराष्ट्र पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) बाबतची जाहिरात संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) बाबत जाहिरात ही स्थानिक दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक नवराष्ट्र भारत वृत्तपत्रामध्ये दि. 05/05/2022 (गुरुवार) रोजी प्रकाशित करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) मधील पदांची पात्रता व इतर तपशील आपले वनविभागाचे संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरिता या सोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदरहु माहिती त्वरीत आपले वनविभागाचे **http://www.mahaforest.gov.in** संकेतस्थळावर (Upload) प्रकाशित करण्यात यावी, हि विनंती.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे.

Ashreelaxmi

**(ए. श्रीलक्ष्मी)**
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपुर.

o/c

**प्रतिलिपी** :- श्री. योगेश काळे, NIC Programmer, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय यांना माहिती व पुढील कार्यवाही करिता अग्रेषित.

# पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर महाराष्ट्र
## पदभरती (कंत्राटी पध्दतीवर)

पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर येथे 11 महिन्याच्या कंत्राटी तत्वावर Biologist, Veterinary Officer, Survey Assistant, Civil Engineer (कंत्राटी पध्दती) ई. जागा भरावयाच्या आहेत.

सदर पदांची पात्रता व इतर तपशिलासाठी दि. 05/05/2022 पासुन **http://www.mahaforest.gov.in** या संकेत स्थळाला भेट दयावी. तसेच पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या कार्यालयामध्ये नोटीस बोर्डवरुन सुध्दा दि. 05/05/2022 पासुन तपशिल प्राप्त करावे. तसेच परिपुर्ण बायोडाटा आणि इतर कागदपत्रे कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, 3 मजला संचार लक्ष्मी बिल्डींग (बी.एस.एन.एल. बिल्डींग) श्रीमोहीनी कॉम्प्लेक्स जवळ, कस्तुरचंद पार्क, नागपुर-440001, दुरध्वनी क्र. 0712-2560727 / 2560748 यांच्या कार्यालयाच्या ई-मेलवर **edpenchfoundation@mahaforest.gov.in** दि. 18/05/2022 रोजी 18.00 वाजेपर्यंत किंवा त्याआधी पाठवावे.

(ए. श्रीलक्ष्मी)
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपुर.

# जाहिरात दिलेल्या पदांची पदसंख्या व मानधन

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पद | मानधन |
|---|---|---|---|
| 1. | Biologist (जीवशास्त्रज्ञ) | 1 | 30,000/- |
| 2. | Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी) | 1 | 50,000/- |
| 3. | Survey Assistant (सर्वेक्षण सहाय्यक) | 1 | 15,000/- |
| 4. | Civil Engineer (स्थापत्य अभियंता) | 1 | 20,000/- |

**टिप :-**

1. वैयक्तिक मुलाखतीसाठी केवळ प्राथमिक निवड (Short listing) झालेल्या उमेदवारांनाच बोलाविण्यात येईल. मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारांना कोणताही भत्ता (TA/DA) लागू राहणार नाही. मुलाखतीची तारीख व वेळ Short listing झालेल्या उमेदवारांना वेगळयाने कळविण्यात येईल.

# जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणीक व अतिरिक्त पात्रता

| अ.क्र. | पदाचे नाव | एकुण पद | मानधन | मुख्यालय | आवश्यक शैक्षणीक पात्रता | अतिरिक्त पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Biologist (जीवशास्त्रज्ञ) | 01 | 30,000/- | सिल्लारी पेंच व्याघ्र प्रकल्प | वन्यजीवन विज्ञान / प्राणीशास्त्र / वानिकी / वनस्पतिशास्त्र / पर्यावरणशास्त्रा मध्ये पदव्युत्तर किमान 60% गुणांसह उत्तीर्ण व पीएचडी. | वन्यजीव क्षेत्रात 3 वर्षांचा अनुभव, वन्यजीव विषयक तांत्रिक कामांचा अनुभव. व्याघ्र सनियंत्रण कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य |
| 2 | Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी) | 01 | 50,000/- | सिल्लारी पेंच व्याघ्र प्रकल्प | स्नातकोत्तरमध्ये मान्यता प्राप्त विद्यापीठातून 60% गुणांसह पदव्युत्तर पदवी. वन्यजीव विषयासह पदव्युत्तर पदवी (एम.व्ही.एस.सी) ला प्राधान्य देण्यात येईल. | वन्यजीव, उपचार व हाताळण्याचा अनुभव. पशुवैद्यकीय शास्त्राच्या क्षेत्रातील किमान 3 वर्षांचा व्यावहारिक अनुभव. |
| 3 | Survey Assistant (सर्वेक्षण सहाय्यक) | 01 | 15,000/- | नागपुर | कोणत्याही शाखेतील पदवीधर, सर्वेअर आय. टी. आय, टंकलेखन वेग इंग्रजी -40 श.प्र.मी., मराठी - 30 श.प्र.मी. सर्वेक्षण / जमीन विषयक / जीआयएस मध्ये अनुभव. | सिमांकन आणि सर्व्हे क्षेत्राचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. |
| 4 | Civil Engineer (स्थापत्य अभियंता) | 01 | 20,000/- | नागपुर | मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान 60% गुणांसह पदवीधर. नागरी बांधकाम संबंधित क्षेत्रात अभियांत्रिकीसह पदव्युत्तर पदवीस प्राधान्य. जर उमेदवाराकडे ऑटोकॅडची शैक्षणिक पात्रता असेल तर अतिरिक्त 3% गुण मिळतील. | मृद व जलसंधारणा कामाचे अंदाजपत्रक तयार करणे. तपासणीचा अनुभव. |

**टिप:-**

1) सर्व पदांना मराठीचे पुरेसे ज्ञान (वाचन, लिहीणे, बोलणे) अत्यावश्यक आहे.

2) वरील तक्त्यातील स्तंभ क्र. 5 मध्ये दर्शविलेल्या मुख्यालया व्यतीरिक्त निवड झालेल्या उमेदवारास कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यक्षेत्रामधील ईतर कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.

3) पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) मधील पदाकरिता आवेदन ईमेल वर सादर करते वेळी **फक्त आपला बायोडाटा (Resume) व अर्ज (Application)** या कार्यालयाचे ईमेल edpenchfoundation@mahaforest.gov.in वर सादर करावे. वरील प्रमाणे दर्शविलेल्या शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता बाबतचे दस्ताऐवज मुलाखतीच्या वेळेस दाखविण्यात यावे याबाबत नोंद घ्यावी. कोणतेही इतर कागदपत्र अर्जासोबत जोडू नये.

4) उमेदवार हा कोणत्याही इतर शासकिय, निमशासकिय अशासकीय संस्था किंवा संघटना यांचा पदाधिकारी असता कामा नये.

5) सदर पदे ही पूर्णवेळ असल्याने या काळात उमेदवाराला इतरत्र काम/प्रॅक्टीस करता येणार नाही.

वरिल सर्व पदाबाबत संगणकाचे पुरेसे ज्ञान अत्यावश्यक/आवश्यक आहे.

Afreelear

(ए. श्रीलक्ष्मी)

कार्यकारी संचालक,

पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपुर.

o/c